

॥ वर्ष - 7 । अंक - 332 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ॥ गुरुवार, दिनांक 23 मे 2024 ॥ पिंपरी-चिंचवड आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ maha_enews ॥ Mahaenews

## आतील पानांत


- राजस्थानचा आरसीबीवर विजय
- विराट कोहलीने रचला इतिहास
- तुम नज़रें ठीक करो!
- ‘RSS शी नातं न सांगणं म्हणजे ढोंग’


## कल्याणीनगर पोर्शे अपघात प्रकरण

# पुण्यात दोन पबला टाळे!

## जिल्हाधिकारी दिवसे यांचा आदेश : पुण्याची संपुर्ण राज्यात बदनामी

। पुणे ।महाईन्यूज

**पोर्शे कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलांना दारू पुरविल्याप्रकरणी पुणे शहरातील हॉटेल ट्रिलियन सिक्युरिटी प्रायव्हेट लिमिटेड (कोझी) व पंचशील इन्फ्रास्ट्रक्चर (ओक वुड) मॅरियट सूट- ब्लॉक या दोन्ही हॉटेल व परमिट रूम तसेच पबचे आस्थापना विषयक व्यवहार जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्या आदेशाने राज्य उत्पादन शुल्क विभागाने तात्काळ प्रभावासह बंद केले आहेत.**



राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने पुणे शहरातील सर्व पब्ससह इतर परमिट रूमची विशेष तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. परवानाधारक हॉटेल, पबमध्ये अल्पवयीन मुलांना कोणत्याही विदेशी मद्याची विक्री करण्यात येवू नये. पहाटे १.३० नंतर कोणत्याही विदेशी मद्याची विक्री करण्यात येवू नये. नोकरनामधारक महिला वेटर्समार्फत रात्री ९.३० नंतर कोणतीही विदेशी दारू सर्व्ह करु नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. बॉम्बे प्रोहिबिशन कायदा १९४९ आणि बॉम्बे फॉरेन लिकर नियम १९५३ अंतर्गत येणाऱ्या विविध तरतुदी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर गुन्हे नोंदविण्यात येणार आहेत. संबंधित हॉटेल, पब आणि आस्थापनेला मद्य विक्रीबाबत देण्यात आलेले परवाने निलंबित अथवा रद्द करण्यात येईल, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पुणे विभागीय उपआयुक्त सागर धोमकर यांनी दिली आहे.

त्याच वेळी कल्याणीनगर, कोरेगाव पार्क, मुंढवा, खराडी या भागात अनधिकृत बांधकामे, शेड मारून अनेक हॉटेल सुरु केले आहेत. इमारतीच्या गच्चीवर अनधिकृतपणे रुफ टॉप हॉटेल सुरु आहेत. इमारतीमध्ये अंतर्गत बदल करून पब सुरु केले आहेत. येथे शेकडो ग्राहक रात्री दारू पिण्यासाठी जात असताना त्यांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष केले जात आहे. कोणत्या भागात किती अनधिकृत हॉटेल आहेत याची माहिती महापालिकेकडे आहेत. त्यांना यापूर्वी नोटिसा बजावल्या आहेत. पण महापालिकेचा धाक नसल्याने कारवाई करूनही पुन्हा हॉटेल सुरु केले जाते. या मुजोरपणापुढे महापालिकेचे वरिष्ठ अधिकारीही हतबल झाले आहेत.

कल्याणीनगर येथील घटनेच्या निमित्ताने महापालिकेने मुंढवा, कोरेगाव पार्क, पुणे स्टेशन, विमाननगर, घोरपडी या भागातील अनधिकृत हॉटेलवर कारवाई सुरु केली आहे. मंगळवारी दोन रुफ टॉप हॉटेलवर कारवाई केली होती. आज ६० ठिकाणी कारवाईचे नियोजन केले होते. त्यापैकी ५४ ठिकाणी सायंकाळपर्यंत कारवाई झाली. यामध्ये हॉटेल अनवाइड, हॉटेल सुपरक्लब, हॉटेल ओरीला या तीन मोठ्या हॉटेलवर जॉ करटने कारवाई करून त्यांचे बांधकाम जमीनदोस्त केले. तर फ्रंट मार्जिन व साइड मार्जिनमधील ४४ छोटे हॉटेल, ७ रुफ टॉप हॉटेलवर कारवाई केली. यामध्ये ५४ हजार ३०० चौरस फुटाचे बांधकाम पाडून टाकण्यात आले. या कारवाईमध्ये १० अभियंता, २१ पोलिस, ४५ एमएसएल, ४० मजूर, जॉ कटर १, जेसीबी ७, ब्रेकर ३, गॅस कटर ३ यांचा समावेश होता.

### 3 बड्या हॉटेलसह तब्बल 54 ठिकाणी कारवाई

**शहरातील रेस्टॉरंट, रुफ टॉप हॉटेल, पबच्या अनधिकृत बांधकामाकडे महापालिकेने दुर्लक्ष केले. मात्र, कल्याणीनगर येथील घटनेनंतर महापालिकेचे डोळे उघडले आहेत. शहरात आज (ता. २२) कारवाईला जोर आला असून, तीन मोठ्या हॉटेलसह ५४ ठिकाणी कारवाई करून ५४ हजार ३०० फूट चौरस फूट बांधकाम पाडून टाकले आहे. शहरातील मोठ्या बांधकाम व्यावसायिकाच्या अल्पवयीन मुलाने दारू पिऊन पोर्शे ही आलिशान कार सुसाट चालवून दोघांचा बळी घेतला. त्यामुळे संपूर्ण देशभरात संताप व्यक्त केला जात आहे. यानिमित्ताने पबमध्ये होणारी नियमांचे उल्लंघन करून होणारी दारू विक्री, वेळेचे उल्लंघन याकडे पोलिस, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे लक्ष वेधले गेले आहेत.**

## जिल्ह्यात मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात मनाई आदेश

### मतमोजणी प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने आदेश निर्गमित

। पुणे ।

महाईन्यूज ।प्रतिनिधी।



जिल्ह्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने मतमोजणी केंद्रात व त्याच्या १०० मीटर परिसरात ४ जून रोजी पहाटे ००.०१ ते मतमोजणी संपेपर्यंत जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी मनाई आदेश निर्गमित केले आहे. मावळ लोकसभा मतदार संघाची मजमोजणी बालेवाडी स्टेडीयम, पुणे आणि बारामती लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी एफसीआय गोडावून कोरेगांव पार्क तर शिरूर लोकसभा मतदार संघाची मतमोजणी स्टेट वेअरहाऊस, गोदाम क्र., ब्लॉक पी-३९, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ रांजणगाव (कारेगांव), ता. शिरूर येथे होणार आहे. १०० मीटर परिसरात सदर वेळेत भ्रमणध्वनी, लॅपटॉप, आयपॅड, मॅचबॉक्स, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे सुरक्षेच्या कारणास्तव मतमोजणी कर्तव्यावर असलेले अधिकारी व कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस जवळ बाळगणे व वापरण्यास मनाई करण्यात आली आहे.

### आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यावर कार्यवाही

**या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ आणि भारतीय दंड विधान कायद्यातील कलम १८८ प्रमाणे दंडनीय कार्यवाही करण्यात येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.**

# आरोपीवर प्रौढ म्हणून खटला चालवणार?

## » आयुक्तांनी सांगितलं पोलिसांचं पुढचं नियोजन

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील कार अपघातातील आरोपीला तो अल्पवयीन आहे म्हणून अवघ्या १५ तासांत विशेष हॉलिडे न्यायालयाने त्याचा जामीन मंजूर केला होता. मात्र बाल हक्क न्यायालयाने याप्रकरणी कडक पावलं उचलली आहेत. बाल हक्क न्यायालयात याप्रकरणी सुनावणी झाली.**



यावेळी आरोपीच्या वकिलांनी तो अल्पवयीन असल्याचा युक्तिवाद केला. तर आरोपीने केलेलं कृत्य भयावह असून त्याच्या चुकीमुळे दोन जणांचा बळी गेला आहे. त्यामुळे त्याच्यावर खटला चालवण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी याप्रकरणी तपास करणाऱ्या पोलिसांनी आणि सरकारी वकिलांनी केली. न्यायालयाने दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर अल्पवयीन आरोपीची १४ दिवसांसाठी बालसुधारगृहात रवानगी केली आहे. तसे आरोपी सज्ञान आहे की अज्ञान हे पोलीस तपासानंतर ठरवलं जाईल, असंही न्यायालयाने स्पष्ट केलं आहे.दरम्यान, यावर पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, "या अपघाताप्रकरणी आम्ही न्यायालयाकडे दोन अर्ज केले होते. हे दोन्ही अर्ज रविवारी (१९ मे) झालेल्या सुनावणीवेळी न्यायालयाने फेटाळून लावले होते. परंतु, आज आम्हाला दोन आघाड्यांवर यश मिळालं आहे. त्याला (१७ वर्षीय आरोपी) देण्यात आलेल्या जामीनात सुधारणा करण्यात आली असून त्याची १४ दिवसांसाठी बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे. त्याच्यावर अडल्ट (प्रौढ) म्हणून खटला चालवला जावा, असा अर्ज आम्ही केला होता. न्यायालयाने हा अर्ज विचाराधीन घेतला आहे. यावर येत्या २४ मे रोजी सुनावणी होईल. आम्ही या प्रकरणी सखोल तपास करून एक मजबूत खटला दाखल करू."या आरोपीने शनिवारी (१८ मे) पुण्यातील कल्याणी नगर भागात त्याच्या वडिलांच्या मालकीच्या पोर्श कारने एका दुचाकीला धडक दिली होती. या अपघातात दुचाकीस्वार आणि दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या तरुणीचा मृत्यू झाला. या अपघातानंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलं होतं. अटकेनंतर १५ तासांनी त्याला विशेष हॉलिडे कोर्टात हजर करण्यात आलं. सरकारी वकिलांनी या आरोपीच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. मात्र, आरोपी अल्पवयीन (साडेसतरा वर्षे) असल्याचा युक्तिवाद त्याच्या वकिलांनी केला.

### बालसुधारगृहात रवानगी

आरोपीला अपघातावर ३०० शब्दांचा निबंध लिहायला सांगितलं होतं. त्याचबरोबर आरोपीला वाहन चालवायला देणाऱ्या व्यक्तीला म्हणजेच त्याच्या वडिलांना अटक करण्याचे आदेशही दिले होते. आरोपीच्या वडिलांना पोलिसांनी मंगळवारी छत्रपती संभाजीनगरमधून अटक केली असून पुणे सत्र न्यायालयाने २४ मेपर्यंतची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे

# पालकमंत्र्यांच्या अनुपस्थितीची चर्चा

## » अजित पवार यांनी भूमिका जाहीर करणे आवश्यक

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कल्याणीनगर येथील मोटार अपघातप्रकरणी राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी थेट पोलीस आयुक्तालयात तळ ठोकून संपूर्ण प्रकाराची माहिती घेऊन पोलिसांना सूचनाही दिलेल्या असताना, दुसरीकडे पुण्याचे पालकमंत्री अजित पवार मात्र घटना घडून चार दिवस उलटून गेले, तरी पुण्यात का आले नाहीत, अशी चर्चा सुरू झाली आहे.**



याबाबत अजित पवार यांनी कोणतीही भूमिका न घेतल्याने, 'पालकमंत्री कुठे आहेत,' असा प्रश्न विचारून विरोधकांनी यावरून टीका केली आहे.कल्याणीनगर येथील अपघातानंतर वडगावशेरीचे अजित पवार समर्थक आमदार सुनील टिंगरे यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्याचे आरोप समाजमाध्यमातून झाले. त्यामुळे ही बाब अजित पवार यांच्यासाठी राजकीयदृष्ट्या अडचणीची ठरल्यामुळे ते या सर्व प्रकारापासून दूर राहिले का, असाही प्रश्न विचारला जात आहे.शहरातील बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवाल यांच्या अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत दुचाकीला धडक दिली होती. या धडकेत दोन युवा संगणक अभियंत्यांना जीव गमवावा लागला होता. कल्याणीनगर येथे रविवारी पहाटे झालेल्या या प्रकाराने राज्यभरात एकच खळबळ उडाली होती. काँग्रेसचे नेते, खासदार राहुल गांधींपासून राज्यातील अनेक नेत्यांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर टीका केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्याशी संपर्क साधला होता, तर उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस आयुक्त कार्यालयात तळ ठोकून या प्रकरणाची माहिती घेतली होती. मात्र, या सर्व प्रकारात पालकमंत्री अजित पवार कुठेच दिसले नाहीत.

अपघाताची घटना घडल्यानंतर वडगावशेरी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील टिंगरे यांनी येरवडा पोलीस ठाण्यात पहाटे धाव घेतली होती. त्यांनी बांधकाम व्यावसायिकाच्या मुलाची बाजू घेतल्याचा आरोप त्यांच्यावर झाला होता. त्यानंतर टिंगरे यांनी त्याबाबतचे स्पष्टीकरण समाजमाध्यमातून देतानाच सर्व आरोप फेटाळले होते. मात्र, त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची बदनामी झाल्याने आणि टिंगरे यांचा पुढाकार घातक ठरण्याच्या शक्यतेने अजित पवार या सर्व प्रकारांपासून लांब राहिल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. एखादी घटना घडल्यानंतर दौऱ्यावर असतानाही अजित पवार पदाधिकारी, शासकीय यंत्रणांच्या सातत्याने संपर्कात असतात, हे वेळोवेळी स्पष्ट झाले आहे. दूरध्वनीवरूनही ते संबंधितांना सूचना करतात, बैठका घेतात. मात्र, या प्रकरणात त्यांनी पदाधिकाऱ्यांबरोबरही संपर्क साधलेला नाही.

> "शहरातील या दुर्दैवी घटनेची पालकमंत्री म्हणून अजित पवार यांनी तातडीने दखल घेणे आवश्यक होते. मात्र त्यांनी ती घेतली नाही, याची खंत आणि खेद वाटत आहे. याबाबत अजित पवार यांनी पुढे येऊन स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे.
>
> **-गोपाळ तिवारी,** राज्य प्रवक्ते,

> "देशभरात चर्चा झालेल्या या घटनेमुळे शहराचा नावलौकिक कमी झाला आहे. पालकमंत्री म्हणून अजित पवार यांनी यासंदर्भात तातडीने भूमिका जाहीर करणे आवश्यक होते. ते या प्रकरणापासून दूर का राहिले, हा प्रश्न नागरिकांनाही पडला आहे.
>
> **-प्रशांत जगताप,**शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष

# दीड महिन्यातच दोनशे कोटींचा महसूल महापालिका तिजोरीत जमा!

## 10 ते 20 टक्के सवलत, कर सवलतीच्या योजनांचा लाभ घ्या; आयुक्त शेखर सिंह

।पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**अनधिकृत होर्डिंग कोसळून होणाऱ्या अपघाताचा धोका कमी करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून शहरामध्ये सर्वंकष सर्वेक्षणास बुधवार, दिनांक 15 मे रोजीपासून सुरुवात करण्यात आली. महानगरपालिकेच्या आठ झोनमध्ये परवाना निरीक्षकांद्वारे शुक्रवार, दिनांक 17 मे पर्यंत दोन दिवसीय सर्वेक्षण करण्यात येणार आहे. सर्वंकष सर्वेक्षणासाठी नोडल अधिकारी म्हणून संदीप खोत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**




पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत महिलांच्या नावाने असलेल्या निवासी मिळकतींवर सामान्य करात 30 टक्के, दिव्यांगाना 50 टक्के सवलत देण्यात येणार आहे. माजी सैनिकांना 100 टक्के सवलत लागू आहे. यापूर्वी लाभ घेतलेल्या महिला, दिव्यांग आणि माजी सैनिकांना नव्याने अर्ज करण्याची गरज नाही. तसेच 2024-25 या आर्थिक वर्षाच्या अवघ्या दीड महिन्यात 25 टक्के मालमत्ता धारकांनी दोनशे कोटी रूपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा केला आहे. त्यामुळे नागरिकांनी 30 जूनपर्यंत विविध मालमत्ता कर सवलतीच्या लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मोकळ्या जमीन, मिश्र अशा सहा लाख 28 हजार मालमत्ता आहेत. नागरिकांना मालमत्ता कराचा घरबसल्या भरणा करता यावा, यासह सर्व सेवा सुविधा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. 30 जूनपर्यंत कराचा भरणा करणाऱ्या नागरिकांसाठी विविध सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. गतवर्षाप्रमाणे यंदाही महापालिकेने महिला बचत गटामार्फत बिलांचे वेळेत वाटप केले आहे. मालमत्ताधारकांना बिल मिळताच कर भरण्यास ते प्राधान्य देत आहेत. त्यामुळेच अवघ्या दीड महिन्यात 1 लाख 81 हजार 968 मालमत्ता धारकांनी तब्बल दोनशे कोटी 39 लाख रूपयांचा कर भरणा केला आहे. पर्यावरण पूरक हौसिंग सोसायट्यांनी सवलतींचा लाभासाठी त्वरित अर्ज करावेत

शहरातील पर्यावरण पूरक हौसिंग सोसायट्यांनी सवलतीचा लाभ घेण्यासाठी लवकर अर्ज करावेत. जेणेकरून अशा सोसायट्यांना आगाऊ कर भरण्याचा आणि पर्यावरण पूरक सवलतीचा एकत्र लाभ घेता येईल.

> **2024-25 या आर्थिक वर्षात 25 टक्के मालमत्ता धारकांनी तब्बल दोनशे कोटी रूपयांचा कर भरणा केला आहे. तसेच मालमत्ता धारकांनी 30 जूनपर्यंत संपूर्ण कराचा भरणा केल्यास किमान दहा टक्के व कमाल 20 टक्के सवलत देण्यात येत आहे. या सवलतींचा मालमत्ता धारकांनी लाभ घ्यावा. त्यानंतर लागणारे महिना दोन टक्के विलंब शुल्क टाळण्यासाठी नागरिकांनी आगाऊ कराचा भरणा करून महापालिकेला सहकार्य करावे.**

> **गतवर्षी 2023-24 च्या पहिल्या तिमाहीत पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मालमत्ता धारकांनी विविध कर सवलतींचा लाभ घेत तब्बल 447 कोटी रुपयांचा कर भरणा केला होता. यंदाही दीड महिन्यात 1 लाख 81 हजार 968 जणांनी विविध कर सवलतींचा लाभ घेत कर भरला आहे.** –**नीलेश देशमुख,** सहाय्यक आयुक्त कर आकारणी व कर संकलन विभाग.

### असा आला कर..

ऑनलाइन – 132 कोटी 92 लाख
रोख – 12 कोटी 14 लाख 64 हजार
धनादेश – 8 कोटी 6 लाख 51 हजार
आरटीजीएस – 1 कोटी 22 लाख 44 हजार
डीडी – 49 लाख 30 हजार
एनएफटी – 4 कोटी 39 लाख 20 हजार
विविध ॲप – 4 कोटी 92 लाख 52 हजार

### मालमत्तांचा प्रकार..सवलत मिळणारी टक्केवारी

१) आगाऊ मालमत्ता कर – 5 टक्के
२) महिलांचे नाव असलेल्या निवासी घरास – 30 टक्के
३) 40 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असणाऱ्या अंध, अपंग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर मालमत्तेस – 50 टक्के
४) स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचे पत्नी यांचे यांच्या एका निवासी घरास – 50 टक्के
५) ऑनलाइन कराचा भरणा करणाऱ्यांना 30 जूनपर्यंत – 5 टक्के
६) जुलै ते सप्टेंबरअखेर पर्यंत भरणा करणाऱ्यांना – 4 टक्के
७) स्वयंफूर्तीने माझी मालमत्ता माझी आकारणी योजनेअंतर्गत मालमत्तांची नोंदणी केल्यास – 5 टक्के
८) इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारल्यास – 2 टक्के
९) संरक्षण दलातील शौर्य पदक धारक आणि माजी सैनिकांना मालमत्ताकरात – 100 टक्के
१०) चालू आर्थिक वर्षात आकारणी पुस्तकात नवीन नोंद होणाऱ्या निवासी, बिगरनिवासी, मिश्र, औद्योगिक, मोकळ्या जागा यांना सामान्य करात – 5 टक्के
११) कंपोस्टींग यंत्रणा, एसटीपी प्लांट, झिरो वेस्ट, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सौर ऊर्जा संकल्पना राबविणाऱ्या इमारतींमधील निवासी मालमत्तांना 5 पासून 10 टक्क्यांपर्यंत सवलत जाहीर करण्यात आली आहे. त्याचबरोबर ग्रीन बिल्डिंग रेटींग तीन ते पाच रेटींगपर्यंत 5 पासून 15 टक्के सवलत जाहीर करण्यात आली आहे.

# आतापर्यंत २० फलकांवर निष्कासनाची कारवाई

## 24 अनधिकृत जाहिरात धारक, जाहिरात फलक धारक, जागा मालकांवर गुन्हा दाखल

।पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**अनधिकृत जाहिरात फलक धारकांविरोधात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कारवाई करण्यास सुरूवात केली आहे. नुकत्याच केलेल्या शहरातील अनधिकृत जाहिरात फलक सर्वेक्षणात आढळून आलेल्या २४ बेकायदेशीर जाहिरात फलक धारक, जाहिरात धारक तसेच जागा मालक यांच्यावर भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ३३६, महाराष्ट्र मालमत्ता विरूपणास प्रतिबंध अधिनियम १९९५ अंतर्गत कलम ३, महानगरपालिका अधिनियम १८८८ अंतर्गत कलम २४४ आणि २४५ या कलमांतर्गत पिंपरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



जाहिरात फलक धारकांसमवेत झालेल्या बैठकीत आयुक्त शेखर सिंह यांनी अनधिकृत जाहिरात फलक हटविण्यासाठी फलक धारकांना सूचित केले होते. १५ ते २० मे २०२४ या कालावधीत महापालिकेने अनधिकृत जाहिरात फलक सर्वेक्षण केले त्यामध्ये २४ अनधिकृत जाहिरात फलक आढळून आले. महापालिकेने आतापर्यंत केलेल्या निष्कासनाच्या कारवाईमध्ये शहरातील एकूण २० अनधिकृत जाहिरात फलक हटविण्यात आले आहेत. त्यामध्ये ९ फलक महापालिकेच्या वतीने निष्कासित करण्यात आले असून ११ अनधिकृत फलक स्वत: फलक धारकांच्या वतीने हटविण्यात आले आहेत. आयुक्त शेखर सिंह म्हणाले, सर्वेक्षणामध्ये आढळून आलेल्या सर्व अनधिकृत फलक धारकांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून सर्व अनधिकृत फलक निष्कासित करण्याची कारवाई सुरू आहे. महापालिकेच्या वतीने फलक धारकांसाठी नवीन स्ट्रक्चरल ऑडिट फॉरमॅट लागू करण्यात येणार आहे. यामुळे जाहिरात फलक धारक शासनाने दिलेल्या नियमांचे पालन करू शकतील आणि सुरक्षित जाहिरात फलक उभारण्याची जबाबदारी टाळू शकणार नाहीत.

### अन्यथा होणार कायदेशीर कारवाई..

जागा मालक, जाहिरात धारक यांनी कोणत्याही खाजगी जागेमध्ये किंवा सार्वजनिक ठिकाणी लोखंडी स्ट्रक्चरवर होर्डिंग बसविताना जाहिरात फलक धारकाच्या हलगर्जीपणामुळे कोणतीही जिवीत किंवा वित्त हानी होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच जाहिरात धारकाने महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये जाहिरात फलक बसविताना जाहिरात फलक धारकाने आकाशचिन्ह व परवाना विभागाकडून रितसर परवानगी घेतलेली आहे की नाही याची खातरजमा करावी. परवानगी घेतली नसल्यास किंवा नियमांचे उल्लंघन केलेले आढळल्यास संबंधित जाहिरात धारक, जागा मालक तसेच फलक धारकावर कायदेशीर कारवाई केली जाईल.



भूमिका

**आज वैशाखी पौर्णिमा. या वैशाख पौर्णिमेचे वैशिष्ट्य म्हणजे याच पौर्णिमेला सिद्धार्थ गौतमाचा जन्म झाला, त्याला ज्ञान प्राप्ती झाली व ते सम्यक संबुद्ध झाले आणि याच पौर्णिमेला तथागत गौतम बुद्ध यांचे महापरिनिर्वाण झाले. असा हा दुर्लभ योग जगात दुसरा कोणताही नाही.**

# बुद्धधम्म : सदाचारी जीवनाचा मार्ग

सिद्धार्थ गौतम यांचा जन्म वैशाख पौर्णिमेच्या दिवशी ख्रिस्तपूर्व ५६३ मध्ये नेपाळच्या लुंबिनी वनात झाला. त्यांच्या आईचे नाव महाराणी महामाया तर वडिलांचे नाव राजा शुद्धोधन होते. शुद्धोधन हे त्यावेळी कपिलवस्तुचे महाराजा होते. सिद्धार्थ गौतमाच्या जन्मा नंतर सातव्या दिवशी राणी महामायेचा मृत्यू झाला. त्यामुळे सिद्धार्थ गौतमाची मावशी आणि शूद्धोधन राजाची दुसरी पत्नी महाराणी प्रजापतीने सिद्धार्थ गौतमाचा सांभाळ केला. सिद्धार्थ मोठा झाल्यावर वयाच्या सोळाव्या वर्षी रितिरिवाजाप्रमाणे त्याचा विवाह सौंदर्यवती व चारित्र्यसंपन्न राजकुमारी यशोधरा हीचेशी स्वयंवर पद्धतीने झाला. यशोधरा ही राजा दंडपाणि (सुप्पबुद्ध) आणि राणी पमिता यांची कन्या होती. विवाहानंतर बरेच वर्षे लोटल्यावर यशोधरेला पुत्र झाला. त्याचे नाव राहूल ठेवण्यात आले. सिद्धार्थ गौतम २१ व्या वर्षी शाक्य संघाचा सदस्य झाला. शाक्यांच्या सीमेला लागून कोलियांचे राज्य होते. रोहिणी नदीच्या पाणी वाटपावरून शाक्य व कोलीय



यांच्यात सतत वाद होत असत. सिद्धार्थने वयाची २८ वर्षे पूर्ण केल्यानंतर पुन्हा रोहिणी नदीच्या पाण्यावरून शाक्य व कोलिय यांच्यात वाद झाला. तेव्हा हा संघर्ष आता युद्धानेच निकालात काढावा म्हणून सेनापतीने संघाचे अधिवेशन बोलावून त्यात कोलियांशी युद्ध करण्याचा ठराव मांडला. मात्र सिद्धार्थ गौतमाने या ठरावाला विरोध केला. युद्धाने प्रश्न सोडविले जाऊ शकत नाहीत. चर्चेतून तोडगा काढावा असा सिद्धार्थाचा युक्तिवाद होता. कारण "*वैराने वैर संपत नाही."* वैराला प्रेमाने जिंकता येते असे त्याचे मत होते. या विरोधामुळे शाक्य संघाने त्याला तीन शिक्षा सूनावल्या. या तीनपैकी कोणतीही एक शिक्षा स्वीकारण्याचा पर्याय त्याला दिला. सिद्धार्थने आपल्यामुळे आपल्या कुटुंबाला त्रास होऊ नये यासाठी परिव्रजा घेऊन गृहत्याग करण्याची शिक्षा स्वीकारली. त्यानुसार त्याने भारद्वाज नावाच्या ऋषीकडून परिव्रज्या घेऊन वयाच्या २९ व्या वर्षी गृहत्याग केला. परिव्रज्या घेतल्यानंतर सिद्धार्थाला एकच प्रश्न पडला तो म्हणजे मानवी जीवनात दुःख का आहे ? आणि हे दुःख दूर करण्याचा मार्ग कोणता ? त्यासाठी त्याने सहावर्षे कठोर तपश्चर्या केली. वेगवेगळ्या मार्गाचा अभ्यास केला. सांख्य तत्वज्ञान, समाधी मार्ग, वैराग्य मार्गही अनुसरला पण त्याला समाधान मिळाले नाही. शेवटी त्याने वैराग्य मार्गाचा त्याग करून उरुवेला येथील सेनानी नावाच्या गृहस्थाची मुलगी सुजाता हिने स्वतः शिजवलेले अन्न भक्षण केले. अन्न भक्षण केल्यानंतर त्याने नव्या ज्ञान प्राप्तीसाठी गयेच्या मार्गाने प्रस्थान केले. तेथे पोहचल्यावर त्याने एका पिंपळवृक्षाखाली चिंतन केले आणि नवा मार्ग शोधला. त्याला सम्यक ज्ञान प्राप्त झाले. तो सम्यक संबुद्ध झाला आणि त्याने जगाला माणसाच्या दुःख मुक्तीचा मार्ग दिला. तो मार्ग म्हणजेच बुद्ध धम्म होय. सिद्धार्थ गौतमाने ज्ञानप्राप्ती केली तो दिवसही वैशाखी पौर्णिमेचा होता. म्हणून ही पौर्णिमेला बुद्ध पौर्णिमा म्हणूनच ओळखली जाते. सिद्धार्थ गौतमाला गया येथे पिंपळवृक्षाली ज्ञानप्राप्ती झाली म्हणून त्या ठिकाणाला बुद्धगया व पिंपळवृक्षाला बोधिवृक्ष असे म्हणतात. सिद्धार्थ गौतम सम्यक संबुद्ध झाले, त्यांना खरी ज्ञानप्राप्ती झाली. त्यानंतर त्याने विचार केला की, आपल्याला मिळालेल्या या ज्ञानाचा आपण जगाला उपदेश करावा आणि जगातील मानवजातीला दुःखातून मुक्त करावे, निर्वाणाचा मार्ग दाखवावा म्हणून वयाच्या ३५ व्या वर्षापासून त्यांनी आपल्या तत्वज्ञानाचा प्रचार प्रसार केला. त्यांनी प्रथमतः सारनाथ येथे आपल्या वैराग्य मार्गातील जुन्या पाच सहकार्यांना या ज्ञानाचा उपदेश केला. त्या पाच सहकाऱ्यांची नावे कौडिण्य,अश्वजित, कश्यप, महानाम आणि भद्रीक अशी होती. त्यांनाच पंचवर्गिय भिख्खू म्हणतात. त्यानंतर तथागत गौतम बुद्ध यांनी आपल्या जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत म्हणजे तब्बल ४५ वर्षे निरंतर पायी फिरून आपल्या तत्वज्ञानाचा प्रसार व प्रचार केला आणि जगातील मानव जातीला दुःखमुक्तीचा मार्ग दिला.

## संपादकीय »

# कमी मार्क

***आज बारावीचा निकाल लागला आहे. 12 वी चा निकाल लागल्यानंतर आता पुढे काय करावं, कोणत्या क्षेत्रात तुम्हाला तुमचं करिअर करता येईल? असा प्रश्न विद्यार्थ्यांना पडला असेल.***

नाराज झालेत. मात्र विद्यार्थ्यांनो, निराश होऊ नका, चिंता करू नका. ही बातमी 12 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठीच आहे. करिअरच्या संधी काय आहेत? कोणत्या क्षेत्रात करिअरच्या काय संधी आहेत? टक्के मिळाले असतील कर काय करावं? कमी गुण मिळाले असतील तरिही तुम्ही उत्तम करिअर करू शकता. त्यासाठी ही बातमी वाचा, तुमच्या जीवनाला दिशा मिळेल. जर तुम्हाल 50% मार्क मिळाले असतील किंवा त्यापेक्षाही कमी गुण मिळाले असतील. तरी चिंता करू नका. कमी गुण असले तरी तुम्ही यशस्वी होऊ शकता. अनेक करिअर ऑप्शन्स सध्या उपलब्ध आहेत. जरा हटके फिल्ड निवडून तुम्ही तुमचं करिअर यशस्वी वाटेवर नेऊ शकता.तुम्हाला दर लोकांशी संवाद साधायला आवडत असेल. तुमची पर्सनॅलिटी चार चौघात उठून दिसत असेल.

शनिवारी रात्री पुण्यात कोरेगाव पार्कमधील कल्याणीनगर येथे भीषण अपघात झाला. दारूच्या नशेत भरधाव वेगात पोर्शे कार चालवणाऱ्या आरोपीने एका दुचाकीला उडविले. यात दुचाकीवरील अनीस दुधिया आणि अश्विनी कोस्टा या दोघांचा मृत्यू झाला. पुण्यातील सर्वच राजकीय पक्षांनी हे प्रकरण लावून धरले आहे.

# स्वातंत्र्याचा झाला आता स्वैराचार !

गेल्या दोन दिवसांपासून राज्यात सर्वाधिक चर्चेत असलेल्या पुण्यातील हायप्रोफाईल अपघातावर वेगवान घडामोडी घडत आहेत. हे प्रकरण पुणे पोलीस आयुक्तांनी गंभीरतेने घेतल्याचे सांगत याप्रकरणी पबचालक व आरोपी वेंदात अग्रवालचे वडिल विशाल अग्रवाल यांना अटक केली आहे. ही घटना घडल्यानंतर पोलिसांनी कारवाई करीत जो काही अहवाल ज्युवेनाईल जस्टीस बोर्डकडे दिला आहे. त्यामध्ये, ३०४ कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. १७ वर्षे ८ महिन्यांचा हा मुलगा असल्याने ज्युवेनाईल जस्टीस बोर्डाने आरोपीला जामीन मंजूर केला. मात्र, निर्भया हत्याकांडनंतर बाल हक्क मंडळामध्ये जे बदल करण्यात आले आहेत, त्यानुसार १६ वर्षांपेक्षा अधिक वयाचा मुलगा असल्यास त्यास प्रौढ म्हणून ट्रीट केलं पाहिजे. त्यानुसार, पोलिसांनी बाल हक्क मंडळापुढे तसा अहवालही दिला होता. मात्र, ज्युवेनाईल जस्टीस बोर्डने तो आदेश सीन अँड साईटप्रमाणे बाजुला ठेवल्याने



आरोपीस जामीन मिळाल्याने प्रकरणाने वेगळे वळण घेतले आहे. विशेष म्हणजे पोलिसांसाठी देखील हा धक्का होता. कारण, पोलिसांनी याप्रकरणात सगळे पुरावे दिले आहेत, तत्काळ वरच्या कोर्टात अर्ज देखील दाखल करण्यात आला आहे. मात्र, वरच्या कोर्टाने सर्वप्रथम ज्युवेनाईल जस्टीस बोर्डाकडे जाण्याचे पोलिसांना सांगितले. त्यामुळे, आम्ही बाल हक्क मंडळाकडे पुन्हा अर्ज दाखल करत आहोत, जर बाल हक्क मंडळाने गंभीर गुन्हा समजून ऑर्डर दिली नाही, तर पोलीस वरच्या कोर्टात जातील, अशा शब्दात गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेद्र फडणवीसांनी भूमिका स्पष्ट केली. याप्रकरणी अंडर एजला दारू सर्व्ह केल्याने पहिल्यांदा संबंधित पबवर कारवाई केली असून चौघांना अटक करण्यात आली आहे. तर, मुलगा अज्ञात असतानाही मुलाला बिना नंबर प्लेटची गाडी दिल्याने वडिलांवरही कारवाई करण्यात आली आहे. मात्र, केवळ १५ तासांतच आरोपी वेदांतला जामीन मिळाल्याने समाजातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. पोलिसांकडून या प्रकरणावर पांघरुन घालण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. पोलिसांनी आरोपी कारचालकास पिझ्झा व बर्गर आणून दिल्याचंही मृतांच्या नातेवाईकांनी म्हटले आहे. त्यामुळे, या घटनेनवरुन राज्यभरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. पुण्यातील कोझी अँड ब्लॅक पबमध्ये बांधकाम व्यवसायिक विशाल अग्रवाल यांचा मुलगा गेला होता. याच बारमध्ये त्याला दारू सर्व्ह करण्यात आली होती. पोलिसांच्या हाती लागलेले सीसीटीव्ही फुटेज याच बारमधील आहेत. आता, या बारमध्ये उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाई करण्यात येत आहे. पुण्यातील मुंढवा परिसरात हा बार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राजीनाम्याबाबत प्रश्न विचारताच कदम संतापले!

## आता भाजपाचे आमदार राम कदम यांनी देशमुख यांना प्रत्युत्तर दिलं

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।



**पुण्यातील पोर्श कार अपघातानंतर राज्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणीस यांना लक्ष्य करत त्यांच्या एका विधानाचा दाखला देत गृहमंत्र्यांचा राजीनामा का नाही मागायचा? असा प्रश्न केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी विरोधकांवर टीका करताना एखादा श्वान गाडीखाली आला तरी विरोधक गृहमंत्र्यांचा राजीनामा मागतील, असं विधान केलं होतं.**

'देवेंद्रजी, आता तुम्हीच सांगा आम्ही गृहमंत्र्यांचा राजीनामा का नाही मागायचा?', असा प्रश्न त्यांनी विचारला. यावर भाजपाचे नेते राम कदम यांनी अनिल देशमुख यांच्यावर टीका करत १०० कोटी वसुली प्रकरणाची आठवण करून देत यासंदर्भात राम कदम यांनी ट्विट केलं आहे.अहो थोडी तरी लाज वाटू द्या, कारण एकतर देवेंद्र फडणवीस घरी बसून राहिले नाहीत. थेट पुणे आयुक्तालयात गेले आणि कारवाईला गती दिली. तुमच्या माहितीसाठी आता प्रौढ आरोपी म्हणून त्याच्यावर खटला चालणार आहे. तुम्हाला तर राजीनामा मागण्याचा अधिकारच नाही. कारण १०० कोटींची वसुली करायला केवळ एकच मुख्यमंत्री अन् गृहमंत्री या राज्याला लाभला. ते कोण हे आम्ही सांगण्याची गरज नाही. एका धन दांडग्या बिल्डर आरोपीला पिकनिकसाठी पुण्यात जायला कोविड काळात पोलिस ताफा कुणी दिला. हे जरा आठवून पहा, म्हणजे तुम्हाला पुढचे काही बोलण्याची हिंमतच होणार नाही. आता बसली की नाही दातखिळी", असं राम कदम यांनी म्हटलं आहे.पुण्यातील पोर्श कार अपघातासंदर्भात एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत अनिल देशमुख यांनी देवेंद्र फडणवीस यांना लक्ष केलं. ते म्हणाले, "देवेंद्रजी काही दिवसांपूर्वी तुम्ही म्हणाला होतात गाडीखाली कुत्रा आला तरी विरोधक राजीनामा मागतील. आज गरिबाघरची दोन लेकरं धनदांडग्याच्या गाडी खाली चिरडली अन् तुमच्या व्यवस्थेने हे दोन जीव घेणाऱ्या हैवानाला पिझ्झा बर्गर खाऊ घातला, दहा तासात जामीन करून दिला (तो पण रविवारी). देवेंद्रजी, आता तुम्हीच सांगा आम्ही गृहमंत्र्यांचा राजीनामा का नाही मागायचा?", असं अनिल देशमुख यांनी म्हटलं होतं.पुण्यामध्ये शनिवारी रात्री महागडी पोर्श गाडी बेदरकारपणे चालवून अल्पवयीन चालकाने अनिश अवधिया आणि अश्विनी कोस्ट यांना धडक दिली. या धडकेत दोघांचाही मृत्यू झाला. या घटनेचे तीव्र पडसाद पुण्यासह राज्यभर उमटत आहेत. या प्रकरणातील आरोपी मुलगा हा पुण्यातील नामांकित बिल्डरच्या मुलगा आहे. या प्रकरणात आता त्या मुलाच्या बिल्डर वडीलांनाही अटक करण्यात आलेली आहे. त्यांच्या या विधानाचा दाखला देत अनिल देशमुख यांनी फडणीसांना लक्ष्य केलं. 'देवेंद्रजी, आता तुम्हीच सांगा आम्ही गृहमंत्र्यांचा राजीनामा का नाही मागायचा?', असा प्रश्न त्यांनी विचारला. यावर भाजपाचे नेते राम कदम यांनी अनिल देशमुख यांच्यावर टीका करत १०० कोटी वसुली प्रकरणाची आठवण करून देत यासंदर्भात राम कदम यांनी ट्विट केलं आहे.अहो थोडी तरी लाज वाटू द्या, कारण एकतर देवेंद्र फडणवीस घरी बसून राहिले नाहीत. थेट पुणे आयुक्तालयात गेले आणि कारवाईला गती दिली. तुमच्या माहितीसाठी आता प्रौढ आरोपी म्हणून त्याच्यावर खटला चालणार आहे. तुम्हाला तर राजीनामा मागण्याचा अधिकारच नाही. कारण १०० कोटींची वसुली करायला केवळ एकच मुख्यमंत्री अन् गृहमंत्री या राज्याला लाभला. ते कोण हे आम्ही सांगण्याची गरज नाहीम्हटलं आहे.पुण्यातील पोर्श कार अपघातासंदर्भात एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत अनिल देशमुख यांनी देवेंद्र फडणवीस यांना लक्ष केलं. ते म्हणाले, "देवेंद्रजी काही दिवसांपूर्वी तुम्ही म्हणाला होतात गाडीखाली कुत्रा आला तरी विरोधक राजीनामा मागतील. आज गरिबाघरची दोन लेकरं धनदांडग्याच्या गाडी खाली चिरडली अन् तुमच्या व्यवस्थेने हे दोन जीव घेणाऱ्या हैवानाला पिझ्झा बर्गर खाऊ घातला, दहा तासात जामीन करून दिला.

### गृहमंत्र्यांचा राजीनामा का नाही मागायचा?

'देवेंद्रजी, आता तुम्हीच सांगा आम्ही गृहमंत्र्यांचा राजीनामा का नाही मागायचा?', असा प्रश्न त्यांनी विचारला. यावर भाजपाचे नेते राम कदम यांनी अनिल देशमुख यांच्यावर टीका करत १०० कोटी वसुली प्रकरणाची आठवण करून देत यासंदर्भात राम कदम यांनी ट्विट केलं आहे.अहो थोडी तरी लाज वाटू द्या, कारण एकतर देवेंद्र फडणवीस घरी बसून राहिले नाहीत. थेट पुणे आयुक्तालयात गेले आणि कारवाईला गती दिली. तुमच्या माहितीसाठी आता प्रौढ आरोपी म्हणून त्याच्यावर खटला चालणार आहे. तुम्हाला तर राजीनामा मागण्याचा अधिकारच नाही. कारण १०० कोटींची वसुली करायला केवळ एकच मुख्यमंत्री अन् गृहमंत्री या राज्याला लाभला. ते कोण हे आम्ही सांगण्याची गरज नाही. एका धन दांडग्या बिल्डर आरोपीला पिकनिकसाठी पुण्यात जायला कोविड काळात पोलिस ताफा कुणी दिला. हे जरा आठवून पहा, म्हणजे तुम्हाला पुढचे काही बोलण्याची हिंमतच होणार नाही. आता बसली की नाही दातखिळी", असं राम कदम यांनी म्हटलं आहे.

# आता नवी पिढी पुढे येते आहे : अजित पवार

## लोकसभेच्या प्रचारात इंदापूरमध्ये वयाच्या मुद्द्यावरून राजकारण?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जुलै २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. याचं सर्वात महत्त्वाचं कारण होतं ते म्हणजे अजित पवार हे भाजपासह जात सत्तेत सहभागी झाले. ते एकटेच गेले नाहीत तर राष्ट्रवादी काँग्रेसचे ४२ आमदार बरोबर घेऊन गेले.**

त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली आणि शरद पवार विरुद्ध अजित पवार असा संघर्ष निर्माण झाला. अजित पवार यांनी ५ जुलैला जी सभा घेतली त्या सभेतही शरद पवारांच्या वयाच्या मुद्दा उपस्थित केला होता. तसंच लोकसभा निवडणूक प्रचारातही शरद पवारांच्या वयाचा मुद्दा आणला होता. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी मात्र यावरुन अजित पवारांचं नाव न घेता त्यांना टोला लगावला आहे.आता नवी पिढी पुढे येते आहे. तुम्ही आशीर्वाद द्या ना.. चुकलं तर सांगा की अजित तुझं हे चुकलं. चूक मान्य करुन दुरुस्त करुन पुढे जाऊ. पण हे कुणासाठी



चाललं आहे? आम्ही कुणाच्या पोटी जन्माला आलो नाही ही आमची चूक आहे का? मित्रांनो आज आपले वरिष्ठ नेते यशवंत राव चव्हाण यांच्या समाधीचं दर्शन घ्यायला गेले होते. यशवंतराव हे आपलं दैवत आहेत. माझ्याकडूनही चूक झाली होती तेव्हा मी एक दिवस आत्मक्लेश केला होता. मला माझंच वागणं मनाला लागलं होतं. आता जर वय जास्त झालं ८२ झालं, ८३ झालं तर तुम्ही कधी थांबणार आहात का? असा प्रश्न अजित पवारांनी विचारला होता."हर्षवर्धन पाटील आणि मी विकासासाठी एकत्र आलो. तुम्ही आमच्यातले आरोप-प्रत्यारोप पाहिले आहेत. मात्र आपला देश महासत्ता व्हावा, सर्व जाती-धर्माचे लोक वंचित राहू नये ही आमची भूमिका आहे." "काही जण म्हणतात या वयात दादांनी साहेबाला सोडायला नको होतं पारावर अशी चर्चा करतात. मित्रांनो मी साहेबांना कधीही सोडलं नाही.

### अख्खं पवार कुटुंब शेकापच्या बाजूने

१९८७ पासून २०२३ पर्यंत साहेब (शरद पवार) म्हणतील ती पूर्व दिशा. मी तुम्हाला आज आवर्जून सांगतो. लहान असताना आजी आजोबांनी सांगितलं होतं आपलं सगळं कुटुंब शेतकरी कामगार पक्षाचं होतं. स्वर्गी वसंत दादा पवार हे पोटनिवडणुकीला उभे होते. त्यावेळी शरद पवार हे महाविद्यालयात होते. त्यावेळी शरद पवारांनी आमच्या थोरल्या काकांना विरोध केला. अख्खं पवार कुटुंब शेकापच्या बाजूने होतं. त्यावेळी शरद पवारांनी विरोधी काम केलं.

# पश्चिम बंगालमध्ये सर्व ओबीसी प्रमाणपत्रे रद्द!

## जातप्रमाणपत्रे कायद्याचे आणि नियमांचे पालन करत नाहीत

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**कोलकाता उच्च न्यायालयाने बुधवारी (२२ मे) एक महत्त्वाचा निकाल दिला. राज्य सरकारने २०१० नंतर जाहीर केलेले सर्व ओबीसी प्रमाणपत्रे उच्च न्यायालयाने रद्द केली आहेत. न्यायमूर्ती तपव्रत चक्रवर्ती आणि राजशेखर मंथा यांच्या खंडपीठाने ओबीसी जातप्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेला आव्हान देणाऱ्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना हा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. उच्च न्यायलयाने पश्चिम बंगाल मागासवर्ग आयोगाला पश्चिम बंगाल मागासवर्ग आयोग कायदा १९९३ च्या आधारे ओबीसींची नवीन यादी तयार करण्याचे निर्देशही दिले आहेत. हा आदेश देताना न्यायालयाने २०१० नंतर तयार करण्यात आलेली ओबीसींची यादी बेकायदेशीर ठरवली आहे. ओबीसी ही यादी रद्द झाल्यामुळे पश्चिम बंगालमधील तब्बल ५ लाख ओबीसी जातप्रमाणपत्र रद्द होणार आहेत.**




जनहित याचिकेवर सुनावणी करत असताना न्यायालयाच्या निदर्शनास आलं की, २०१० नंतर तयार करण्यात आलेली ओबीसी यादी किंवा ओबीसी जातप्रमाणपत्रे कायद्याचे आणि नियमांचे पालन करत नाहीत. उच्च न्यायालयाने म्हटलं आहे की, “२०१० नंतर जितकी ओबीसी जातप्रमाणपत्रे बनवण्यात आली ती बेकायदेशीर आहेत. ही प्रमाणपत्रे बनवताना कायदा आणि नियम धाब्यावर बसवले होते.”दरम्यान, न्यायालयाने स्पष्ट केलं आहे की, २०१० च्या आधी जी ओबीसी जातप्रमाणपत्रे बनवण्यात आली आहेत त्यावर या आदेशाचा कोणताही परिणाम होणार नाही. ती प्रमाणपत्रे वैध राहतील. तसेच न्यायालयाने म्हटलं आहे की, “ज्या लोकांनी या २०१० नंतर बनवलेल्या प्रमाणपत्राच्या सहाय्याने नोकरी मिळवली आहे किंवा ज्यांची नोकरीची प्रक्रिया चालू आहे त्यांच्यावर या आदेशाचा काहीही परिणाम होणार नाही. इतर लोक आता या प्रमाणपत्रांचा वापर करू शकणार नाहीत.”कोलकाता उच्च न्यायालयाने बुधवारी ज्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना हा आदेश दिला तो खटला २०१२ मध्ये दाखल करण्यात आला होता. जनहित याचिकेवरील ही सुनावणी तब्बल १२ वर्षे चालली आणि आज न्यायालयाने यावर निकाल दिला. याचिकाकर्त्यांचे वकील सुदिप्ता दासगुप्ता आणि विक्रम बॅनर्जी न्यायालयात म्हणाले, डाव्या आघाडी सरकारने २०१० मध्ये अंतरिम अहवालाच्या आधारे पश्चिम बंगालमध्ये इतर मागासवर्गीयांचा वेगळा वर्ग तयार केला होता. या वर्गाला ओबीसी-अ असं नाव देण्यात आलं आहे. न्यायालयाने ओबीसी-अ वर्गातील बहुसंख्य प्रमाणपत्रे रद्द केली आहेत. दरम्यान, “उच्च न्यायालयाचा हा निर्णय आम्हाला मान्य नाही”, अशी संतप्त प्रतिक्रिया पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री तथा तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी दिली आहे.जनहित याचिकेवर सुनावणी करत असताना न्यायालयाच्या निदर्शनास आलं की, २०१० नंतर तयार करण्यात आलेली ओबीसी यादी किंवा ओबीसी जातप्रमाणपत्रे कायद्याचे आणि नियमांचे पालन करत नाहीत. उच्च न्यायालयाने म्हटलं आहे की,“२०१० नंतर जितकी ओबीसी जातप्रमाणपत्रे बनवण्यात आली ती बेकायदेशीर आहेत. ही प्रमाणपत्रे बनवताना कायदा आणि नियम धाब्यावर बसवले होते.”दरम्यान, न्यायालयाने स्पष्ट केलं आहे की, २०१० च्या आधी जी ओबीसी जातप्रमाणपत्रे बनवण्यात आली आहेत त्यावर या आदेशाचा कोणताही परिणाम होणार नाही. ती प्रमाणपत्रे वैध राहतील. तसेच न्यायालयाने म्हटलं आहे की, “ज्या लोकांनी या २०१० नंतर बनवलेल्या प्रमाणपत्राच्या सहाय्याने नोकरी मिळवली आहे किंवा ज्यांची नोकरीची प्रक्रिया चालू आहे त्यांच्यावर या आदेशाचा काहीही परिणाम होणार नाही. इतर लोक आता या प्रमाणपत्रांचा वापर करू शकणार नाहीत.”कोलकाता उच्च न्यायालयाने बुधवारी ज्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना हा आदेश दिला तो खटला २०१२ मध्ये दाखल करण्यात आला होता. जनहित याचिकेवरील ही सुनावणी तब्बल १२ वर्षे चालली आणि आज न्यायालयाने यावर निकाल दिला. याचिकाकर्त्यांचे वकील सुदिप्ता दासगुप्ता आणि विक्रम बॅनर्जी न्यायालयात म्हणाले, डाव्या आघाडी सरकारने २०१० मध्ये अंतरिम अहवालाच्या आधारे पश्चिम बंगालमध्ये इतर मागासवर्गीयांचा वेगळा वर्ग तयार केला होता. या वर्गाला ओबीसी-अ असं नाव देण्यात आलं आहे. न्यायालयाने ओबीसी-अ वर्गातील बहुसंख्य प्रमाणपत्रे रद्द केली आहेत. दरम्यान, “उच्च न्यायालयाचा हा निर्णय आम्हाला मान्य नाही”, अशी संतप्त प्रतिक्रिया पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री तथा तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी दिली आहे.

### ओबीसींची यादी बेकायदेशीर

कोलकाता उच्च न्यायालयाने बुधवारी (२२ मे) एक महत्त्वाचा निकाल दिला. राज्य सरकारने २०१० नंतर जाहीर केलेले सर्व ओबीसी प्रमाणपत्रे उच्च न्यायालयाने रद्द केली आहेत. न्यायमूर्ती तपव्रत चक्रवर्ती आणि राजशेखर मंथा यांच्या खंडपीठाने ओबीसी जातप्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेला आव्हान देणाऱ्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना हा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. उच्च न्यायलयाने पश्चिम बंगाल मागासवर्ग आयोगाला पश्चिम बंगाल मागासवर्ग आयोग कायदा १९९३ च्या आधारे ओबीसींची नवीन यादी तयार करण्याचे निर्देशही दिले आहेत. हा आदेश देताना न्यायालयाने २०१० नंतर तयार करण्यात आलेली ओबीसींची यादी बेकायदेशीर ठरवली आहे.

# ‘RSS शी असलेलं नातं न सांगणं म्हणजे ढोंग’

## निवृत्त न्यायाधीश चित्तरंजन दास आपल्या वक्तव्यावर ठाम

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**कोलकाता उच्च न्यायालयाचे न्यायाधीश चित्तरंजन दास यांनी सोमवारी निवृत्ती घेतली. यावेळी त्यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात आपण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असल्याचं जाहीर केलं. चित्तरंजन दास यांचं हे भाषण चांगलंच चर्चेत आलं. गेल्या काही वर्षांपासून ते कोलकाता उच्च न्यायालयात होते. त्याआधी ते ओडिशा उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून कार्यरत होते.**



या कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले, “काही लोकांना हे आवडणार नाही. पण मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सदस्य होतो. हे मला या ठिकाणी मान्य करावे लागेल.” त्यानंतर त्यांचं हे विधान चांगलंच चर्चेत आलं. यानंतर त्यांनी पुन्हा एकदा आपल्या विधानावर स्पष्टीकरण देत ‘आरएसएसशी असलेलं आपलं नातं न सांगणं म्हणजे ढोंग होईल’, असं म्हणत आपण केलेल्या विधानावर ते ठाम असल्याचं सांगण्याचा प्रयत्न केला. टाईम्स ऑफ इडियाने या संदर्भातील वृत्त दिलं आहे.निरोप समारंभाच्या कार्यक्रमात मी जे बोललो ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत उत्स्फूर्तपणे माझ्या मनात आलं आणि मी त्याबद्दल बोललो. मी माझ्या आयुष्यात असलेल्या लोकांचे आभार मानले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी असलेलं नातं सांगितलं नसतं तर ते म्हणजे ढोंग झालं असतं. देवाने मला आरएसएसवर बोलण्याची प्रेरणा दिली. आरएसएस हे माझं मूळ आहे. पण मी ३७ वर्षांपूर्वी त्यापासून वेगळे झालो होतो. मात्र, मी जर ते स्वीकारलं नसतं तर हा ढोंगीपणा झाला असता”, असं चित्तरंजन दास यांनी म्हटलं आहे.“काही लोकांना हे आवडणार नाही. मात्र, आज या ठिकाणी सांगू इच्छितो की, मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सदस्य होतो. मी त्या संघटनेला खूप काही देणे लागतो. मी संघाचा खूप ऋणी आहे. मी लहानपणापासून ते मोठा होईपर्यंत तेथे होतो. धाडस, प्रामाणिकपणा, सारखा दृष्टीकोन, देशभक्ती, कामाची भावना हे सर्व मी तेथे शिकलो. मात्र, माझ्या कामामुळे ३७ वर्षांपासून आरएसएसपासून दूर आहेत. त्याचा उपयोग मी कधी माझ्या कारकिर्दीत केला नाही. मी संघाच्या सदस्यत्वाचा वापर करून प्रगती केली नाही. कारण ते माझ्या तत्वांच्या विरुद्ध आहे. सगळ्यांना समान वागणूक दिली.

### दास यांचं हे भाषण चांगलंच चर्चेत

मग तो श्रीमंत असो किंवा गरीब, साम्यवादी असो किंवा भाजपाचा, काँग्रेसचा किंवा तृणमूल काँग्रेसचा सदस्य असो, अशा सर्वांना समान वागणूक दिली”, असं चित्तरंजन दास यांनी आपल्या निरोप समारंभाच्या कार्यक्रमात म्हटलं आहे.कोलकाता उच्च न्यायालयाचे न्यायाधीश चित्तरंजन दास यांनी सोमवारी निवृत्ती घेतली. यावेळी त्यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात आपण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असल्याचं जाहीर केलं. चित्तरंजन दास यांचं हे भाषण चांगलंच चर्चेत आलं. गेल्या काही वर्षांपासून ते कोलकाता उच्च न्यायालयात होते. त्याआधी ते ओडिशा उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून कार्यरत होते.

# सनीने केला मराठी गाण्यावर जबरदस्त डान्स



बॉलीवूड अभिनेत्री सनी लिओनी तिच्या बोल्ड अंदाजामुळे नेहमी चर्चेत असते. अभिनयाबरोबरच आपल्या वैयक्तिक आयुष्याबद्दलचे अपडेट्स ती सोशल मीडियावर शेअर करताना दिसते. उत्तम डान्सर असलेली सनी लिओनी नुकतीच मराठी गाण्यावर थिरकली होती. सनीचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होताना दिसत आहे. हृता दुर्गुळे अभिनीत 'कन्नी' या मराठी चित्रपटातील 'नवरोबा नवरोबा' गाण्यावर सनी हटके डान्स मूव्हज करताना पाहायला मिळतेय. क्रॉप टॉप आणि मिनी स्कर्ट असा को-ऑर्ड सेट तिने या गाण्यासाठी परिधान केला आहे. निळ्या रंगाच्या बूटस आणि मॅचिंग हॅटची निवड करीत सनीने हा लूक पूर्ण केला आहे.

# राघवन या पात्रासाठी कोणाला घ्यायचं..!

प्रसिद्ध फिल्ममेकर आणि कोरिओग्राफर फराह खानने शाहरुख खानच्या 'मैं हूं ना' या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शनात पदार्पण केले. शाहरुख खानची प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली. या चित्रपटात झायेद खान, सुष्मिता सेन, अमृता राव आणि सुनील शेट्टी यांसारखे दिग्गज कलाकारही मुख्य भूमिकेत होते. फराहने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत या सगळ्यांना एका चित्रपटासाठी एकत्र आणण्यात आलेल्या आव्हानांबद्दल खुलासा केला आहे. या चित्रपटाच्या कास्टिंगसाठी फराह खानला बऱ्याच समस्या आल्या. याबद्दलच तिने मॅशेबल इंडियाच्या 'द बॉम्बे ड्रीम शोम'ध्ये कास्टिंग डायरेक्टर मुकेश छाब्रा यांच्याशी संवाद साधताना खुलासा केला. शाहरुखने एका झटक्यात तिच्या चित्रपटाला होकार दिला, पण इतरांचं कास्टिंग करताना मात्र फराहला खूपच त्रास झाला. झायेद खानच्या भूमिकेसाठी याआधी हृतिक रोशन, अभिषेक बच्चन व सोहेल खान यांना विचारण्यात आलं होतं अन् अमृता रावच्या भूमिकेसाठी प्रथम आयेशा टाकीया ही फराहची पहिली पसंती होती. हे तिने या मुलाखतीदरम्यान स्पष्ट केलं.या चित्रपटातील खलनायक म्हणजेच राघवन या पात्रासाठी कोणाला घ्यायचं हादेखील फराहसमोर एक मोठा प्रश्न होता. या भूमिकेसाठी शाहरुखच्या आग्रहाखातर फराहने कमल हासन यांनाही विचारलं होतं, शाहरुखच्या चित्रपटाला ते नकार देणार नाहीत.

# तुम नज़रें ठीक करो!



प्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी ही सोशल मीडियावर विविध पोस्ट शेअर करत असते. हेमांगीच्या 'बाई, बुब्स आणि ब्रा' या पोस्टनं अनेकांचे लक्ष वेधलं होते. हेमांगी विविध विषयांवर आधारित पोस्ट शेअर करत असते. आता हेमांगीनं जागतिक महिला दिनानिमित्त खास पोस्ट शेअर केली आहे. हेमांगीनं या पोस्टमध्ये स्वत:चा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये हेमांगी ही खिडकीच्या बाहेर दिसताना दिसत आहे. हेमांगीनं तिच्या या फोटोला खास कॅप्शन देखील दिलं आहे. या कॅप्शनमध्ये तिनं परीतोष त्रिपाठी यांची कविता लिहिली आहे. या कवितेनं अनेकांचे लक्ष वेधलं आहे.पुढे हेमांगीनं पोस्टमध्ये लिहिलं, "परीतोष त्रिपाठी जियो! कल के दौरान आपने ये पंक्तियां पेश की और मेरी आंखें भर आयी. इसमें वो हर एक शब्द है, है, जो मैं पिछले कुछ दिनों से कहना चाहती थी, जोर जोर से चिल्लाना चाहती थी! कुछ लोगों के लिए औरतों की किसी भी क्षेत्र में पायी गयी कोई मायने ही नहीं रखती. ऐसे लोग सिर्फ और सिर्फ उसने कपडे क्या पहने हैं, कैसे पहने हैं इस बात पर वक्त निकाल निकाल के बाते करते हैं, करते हैं, अपना और दुसरों का वक्त जाया करते हैं!के जरीए संस्कृती और सभ्यता के नाम पर हमें फिरसे गुलाम, कमजोर बनाना चाहते हैं!

# राधिकाने चित्रपटातील संवाद केले कॉपी!

मुकेश अंबानी व नीता अंबानी यांचे छोटे सुपुत्र अनंत अंबानी यंदा लग्नबंधनात अडकणार आहेत. जुलै महिन्यात राधिका मर्चंटशी अनंत अंबानी लग्नगाठ बांधणार आहेत. त्याआधी नुकताच जामनगरमध्ये दोघांचा मोठ्या थाटामाटात प्री-वेडिंग सोहळा पार पडला. १ मार्च ते ३ मार्च असा तीन दिवसांच्या या सोहळ्याला देश-विदेशातून दिग्गज मंडळी उपस्थित राहिली होती. अनंत-राधिकाच्या प्री-वेडिंग सोहळ्याची चर्चा देशासह जगभरात अजूनही सुरू आहे. फोटो, व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत. अशातच प्री-वेडिंग सोहळ्यात मुकेश अंबानींच्या धाकट्या सूनेने दिलेल्या भाषणात हॉलीवूड चित्रपटातील संवाद कॉपी केल्याचं समोर आलं आहे. यासंबंधित व्हिडीओ सोशल मीडियावर खूपच चर्चेत आला आहे.अनंत अंबानींची होणारी पत्नी राधिका मर्चंट हिने अंबानी कुटुंबासाठी एका भाषणातून भावना व्यक्त केल्या होत्या. मुकेश अंबानींपासून ते श्लोका मेहतापर्यंत अंबानी कुटुंबातील प्रत्येक सदस्याविषयी राधिका बोलली होती. यावेळी तिने होणारे पती अनंत यांच्यासाठी हृदयस्पर्शी भाष्य केलं. जे ऐकून नेटकऱ्यांना एका हॉलीवूड चित्रपटाची आठवण झाली.राधिकाचा हा व्हिडीओ 'सादिक सलीम' या इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आला आहे. ज्यामध्ये २००४ साली प्रदर्शित झालेल्या SHALL WE DANCE? या चित्रपटातील संवाद अंबानींच्या होणाऱ्या सूनेने आपल्या भाषणात कॉपी केले आहेत. या चित्रपटात अभिनेत्री सुसान सरंडन हे संवाद म्हणताना दिसत आहेत. तिचे हेच संवाद शब्दशः राधिका बोलताना पाहायला मिळत आहे. 'विटनेस टु योर लाइफ' असं या संवादाचे नाव आहे. राधिकाचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.या व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी राधिकाला ट्रोल केलं आहे. तर काही नेटकऱ्यांनी तिचं समर्थन केलं आहे. एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, 'चॅटजीपीटीने सुद्धा चांगले संवाद लिहून देण्याच काम केलं असतं.' तसंच दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, 'एवढा पैसा खर्च केला. तर एखाद्या संवाद लेखकाला कामासाठी घेऊ शकला असता.' तर तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, 'आता हिला आरामात चित्रपटाच्या ऑफर मिळतील.' अशा अनेक प्रतिक्रिया या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी दिल्या आहेत.दरम्यान, अनंत-राधिका यांच्या प्री-वेडिंग सोहळ्याच्या पहिल्या दिवशी, १ मार्चला जगप्रसिद्ध पॉप स्टार रिहानाचा परफॉर्मन्स झाला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी संगीत सोहळा झाला. यामध्ये बॉलीवूडच्या सेलिब्रिटींनी जबरदस्त परफॉर्मन्स केला. तिसऱ्या दिवशी, ३ मार्चला 'टस्कर ट्रेल्स' आणि 'हस्ताक्षर' कार्यक्रम झाला. 'टस्कर ट्रेल्स' हा आउटडोअर कार्यक्रम होता.

# अमिषा पटेल व्याजासहित पैसे द्यायला तयार



चेक बाऊन्स प्रकरणी गेल्या काही वर्षांपासून अभिनेत्री अमिषा पटेल (AMEESHA PATEL) ही चर्चेत आहे. आता न्यायदंडाधिकारी दिग्विजय नाथ शुक्ला यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली आहे. यावेळी अमिषा पटेलनं तक्रारदाराशी तडजोड करून त्याला व्याजासहित 2.75 कोटी रुपये देण्याचे मान्य केल्याचे सांगण्यात आले.कोर्टातील सुनावणीदरम्यान अमिषा पटेलच्या वकिलाने न्यायालयाला सांगितले की, अमिषा पटेल तक्रारदाराला पाच हप्त्यांमध्ये 2.75 कोटी रुपये देण्यास तयार आहे. याप्रकरणी अंतिम स्तरावर चर्चा सुरू आहे. यावर तक्रारदाराचे वकील विजय लक्ष्मी श्रीवास्तव यांनी सांगितले की, अमिषा पटेल यांना स्वतः हजर राहून तडजोड अर्जावर स्वाक्षरी करावी लागेल. न्यायालयाने अमिषा पटेलला आज (7 मार्च) जबाबा नोंदवण्यासाठी कोर्टात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. तक्रारदाराचा जबाब नोंदवल्यानंतरआता अमिषा पटेल आणि कुणाल ग्रुमर यांचा जबाब नोंदवण्यात येणार आहे. यासाठी दोघांनाही न्यायालयात हजर रहावं लागणार आहे.रांचीच्या अरगोरा येथील रहिवासी असलेले चित्रपट निर्माता अजय कुमार सिंह यांनी देसी मॅजिक चित्रपट बनवण्यासाठी अमिषा पटेलला अडीच कोटी रुपये दिले होते, पण या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली नाही. यानंतर अजय कुमार सिंह यांनी अमिषा पटेलकडे पैसे परत मागितले. अमिषानं अजय कुमार सिंह यांना दोन चेक दिले, हे चेक बाऊंस झाले. या प्रकरणी अजय कुमार सिंह यांनी 2018 मध्ये अमिषा पटेल आणि कुणाल ग्रुमर यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर अमिषा पटेलने 17 जून रोजी रांची दिवाणी न्यायालयात आत्मसमर्पण केले होते. सध्या अमिषा ही जामिनावर आहे. अमिषा पटेलचा गदर-2 हा चित्रपट गेल्या वर्षी प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर रेकॉर्ड ब्रेक कमाई केली आहे. आता अमिषाच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.चेक बाऊन्स प्रकरणी गेल्या काही वर्षांपासून अभिनेत्री अमिषा पटेल (AMEESHA PATEL) ही चर्चेत आहे. आता न्यायदंडाधिकारी दिग्विजय नाथ शुक्ला यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली आहे. यावेळी अमिषा पटेलनं तक्रारदाराशी तडजोड करून त्याला व्याजासहित 2.75 कोटी रुपये देण्याचे मान्य केल्याचे सांगण्यात आले.कोर्टातील सुनावणीदरम्यान अमिषा पटेलच्या वकिलाने न्यायालयाला सांगितले की, अमिषा पटेल तक्रारदाराला पाच हप्त्यांमध्ये 2.75 कोटी रुपये देण्यास तयार आहे. याप्रकरणी अंतिम स्तरावर चर्चा सुरू आहे. यावर तक्रारदाराचे वकील विजय लक्ष्मी श्रीवास्तव यांनी सांगितले की, अमिषा पटेल यांना स्वतः हजर राहून तडजोड अर्जावर स्वाक्षरी करावी लागेल.

# राजस्थानचा आरसीबीवर विजय!

## आयपीएलचे जेतेपद पटकावण्याचे आरसीबीचे स्वप्न भंगले

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**रोव्हमन पॉवेलच्या विजयी षटकारासह राजस्थानने आरसीबीवर ४ विकेट्सने मोठा विजय मिळवला. यासह आयपीएलचे जेतेपद पटकावण्याचे आरसीबीचे स्वप्न यंदाही भंगले आहे, रियान पराग आणि शिमरॉन हेटमायरची भागीदारी राजस्थान रॉयल्स संघाने ४ विकेट्सने मोठा विजय मिळवला आहे. या विजयासह राजस्थानचा संघ आयपीएल २०२४च्या दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात खेळणार आहे. सनरायझर्स हैदराबाद विरूद्ध राजस्थान रॉयल्समधील जो संघ जिंकेल तो संघ केकेआरविरूद्ध अंतिम सामन्यात खेळेल. आरसीबीनेही एलिमिनेटर सामन्यात अटीतटीची लढत दिली पण संघ विजय मिळवण्यात अपयशी ठरला.**



प्रथम फलंदाजी करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने ८ गडी गमावून १७२ धावा केल्या. रजत पाटीदार ३४, लोमरोर ३२, तर विराट कोहलीने ३३ धावांची खेळी केली. राजस्थानकडून आवेश खानने ३ विकेट घेतल्या. अश्विनने दोन गडी बाद केले. प्रत्युत्तरात राजस्थान रॉयल्सने काही विकेट्स गमावल्या, परंतु सामना ४ विकेटने जिंकण्यात यश मिळविले.रियान पराग आणि हेटमायरने ग्रीनच्या षटकात चांगल्याच धावा केल्या. यासह सामना राजस्थानच्या बाजूने झुकला. यशस्वी जैस्वाल आणि कोहलर कॅडमोरे संघाला चांगली सुरूवात करून दिली. जैस्वालने यशस्वी जैस्वालने सर्वाधिक ४५ धावांची खेळी खेळली. रियान परागने ३६ आणि सिमरन हेटमायरने २६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली. यशस्वी जैस्वालची विकेट गमावल्यानंतर राजस्थान रॉयल्स संघाला तिसरा धक्का कर्णधार सॅमसनच्या रूपाने बसला ज्याने केवळ १७ धावांची इनिंग खेळल्यानंतर आपली विकेट गमावली. यानंतर ११२ धावांवर राजस्थान संघाला चौथा धक्का ध्रुव जुरेलच्या रूपाने बसला जो ८ धावांवर धावबाद झाला. येथून रियान परागने एका टोकापासून डाव सांभाळत शिमरॉन हेटमायरच्या साथीने ५व्या विकेटसाठी २५ चेंडूत ४५ धावांची भागीदारी केली आणि सामना पूर्णपणे राजस्थानच्या बाजूने वळवला.तत्पूर्वी राजस्थान रॉयल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला जो संघाच्या चांगलाच पथ्यावर पडला. गोलंदाजांच्या शानदार प्रयत्नामुळे राजस्थान रॉयल्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला आठ विकेट्सवर १७२ धावांवर रोखले. आरसीबीच्या फलंदाजांना नियमित अंतराने बाद करत मोठी भागीदारी रचू दिली नाही. याआधीच्या सामन्यांमध्ये बराच काळ विकेट न घेतलेल्या अनुभवी रविचंद्रन अश्विनने १९ धावांत दोन विकेट घेतले. जे फारच महत्त्वाचे ठरले. त्याने चांगली गोलंदाजी करत कॅमेरॉन ग्रीन (२७) आणि ग्लेन मॅक्सवेल (०) यांचे सलग चेंडूंवर विकेट घेतले, त्यानंतर आवेश खानने ४४ धावांत तीन विकेट घेतले. या पराभवासह आरसीबीचा संघ आयपीएल २०२४ मधून बाहेर पडला आहे. सलग सहा सामने जिंकत केलेल्या विलक्षण पुनरागमनासह आरसीबी प्लेऑफमध्ये पोहोचला. एलिमिनेटर सामन्यात आरसीबीचा संघ पराभूत झाला असला तरी त्यांचे हे पुनरागमन सर्वांच्या लक्षात नक्कीच राहिल.प्रथम फलंदाजी करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने ८ गडी गमावून १७२ धावा केल्या. रजत पाटीदार ३४, लोमरोर ३२, तर विराट कोहलीने ३३ धावांची खेळी केली. राजस्थानकडून आवेश खानने ३ विकेट घेतल्या. अश्विनने दोन गडी बाद केले. प्रत्युत्तरात राजस्थान रॉयल्सने काही विकेट्स गमावल्या, परंतु सामना ४ विकेटने जिंकण्यात यश मिळविले.रियान पराग आणि हेटमायरने ग्रीनच्या षटकात चांगल्याच धावा केल्या. यासह सामना राजस्थानच्या बाजूने झुकला. यशस्वी जैस्वाल आणि कोहलर कॅडमोरे संघाला चांगली सुरूवात करून दिली. जैस्वालने यशस्वी जैस्वालने सर्वाधिक ४५ धावांची खेळी खेळली.

### हेटमायरची 26 धावांची महत्त्वपूर्ण खेळी

रियान परागने ३६ आणि सिमरन हेटमायरने २६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली. यशस्वी जैस्वालची विकेट गमावल्यानंतर राजस्थान रॉयल्स संघाला तिसरा धक्का कर्णधार सॅमसनच्या रूपाने बसला ज्याने केवळ १७ धावांची इनिंग खेळल्यानंतर आपली विकेट गमावली. यानंतर ११२ धावांवर राजस्थान संघाला चौथा धक्का ध्रुव जुरेलच्या रूपाने बसला जो ८ धावांवर धावबाद झाला. येथून रियान परागने एका टोकापासून डाव सांभाळत शिमरॉन हेटमायरच्या साथीने ५व्या विकेटसाठी २५ चेंडूत ४५ धावांची भागीदारी केली आणि सामना पूर्णपणे राजस्थानच्या बाजूने वळवला.गोलंदाजांच्या शानदार प्रयत्नामुळे राजस्थान रॉयल्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला आठ विकेट्सवर १७२ धावांवर रोखले. आरसीबीच्या फलंदाजांना नियमित अंतराने बाद करत मोठी भागीदारी रचू दिली नाही.

# विराट कोहलीने एलिमिनेटर सामन्यात रचला इतिहास

## 29 धावा पूर्ण करताच 'ही' कामगिरी करणारा ठरला पहिला खेळाडू

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएल २०२४ च्या एलिमिनेटर सामन्यात विराट कोहलीने इतिहास रचला आहे. राजस्थान रॉयल्स वि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर हा सामना खेळवला जात आहे. राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसनने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अशा परिस्थितीत आरसीबी प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरला. आरसीबीचा सलामीवीर विराट कोहलीने या सामन्यात २९ धावा करताच मोठी कामगिरी आपल्या नावे केली आहे. आयपीएलच्या इतिहासात अशी कामगिरी कोणत्याच खेळाडूला करता आलेली नाही.**

कोहलीने २५२व्या आयपीएल सामन्याच्या २४४व्या डावात ८ हजार धावा पूर्ण केल्या. लीगमध्ये ४०००, ६००० आणि ७००० धावा करणारा तो सर्वात वेगवान फलंदाज आहे. आयपीएलमध्ये सर्वात जलद १००० धावा अॅडम गिलख्रिस्टने केल्या होत्या. तर सर्वात जलद २००० धावा, ३००० धावा आणि ५००० धावा सुरेश रैनाने केल्या होत्या.




आयपीएल २०२४ मध्येही विराट कोहलीची बॅट चांगलीच तळपताना दिसली आहे. १७व्या हंगामात सर्वाधिक धावा करणारा फलंदाज हा विराट कोहलीचं आहे त्याच्या आसपासही इतर कोणताच फलंदाज नाही.विराट कोहली आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आहे. या यादीत शिखर धवन दुसऱ्या, रोहित शर्मा तिसऱ्या, डेव्हिड वॉर्नर चौथ्या आणि सुरेश रैना पाचव्या स्थानावर आहे. या यादीत महेंद्रसिंग धोनी (५२४३ धावा) सहाव्या, एबी डिव्हिलियर्स (५१६२ धावा) सातव्या, ख्रिस गेल (४९६५ धावा) आठव्या, रॉबिन उथप्पा (४९५२ धावा) नवव्या आणि दिनेश कार्तिक (४८३१ धावा) दहाव्या स्थानावर आहे. एलिमिनेटर सामन्यात विराट कोहलीने संघाला चांगली सुरूवात करून दिली. पण तो मोठी खेळी करू शकला नाही . विराट २४ चेंडूत ३ चौकार आणि एका षटकारासह ३३ धावा करत चहलच्या गोलंदाजीवर बाद झाला. १० षटकांनंतर प्रथम फलंदाजी करताना आरसीबीची धावसंख्या २ बाद ७६ धावा आहे. आयपीएलमध्ये तब्बल ८ हजार धावा करणारा विराट कोहली पहिला फलंदाज ठरला आहे. कोहलीने २५२व्या आयपीएल सामन्याच्या २४४व्या डावात ८ हजार धावा पूर्ण केल्या. लीगमध्ये ४०००, ६००० आणि ७००० धावा करणारा तो सर्वात वेगवान फलंदाज आहे. आयपीएलमध्ये सर्वात जलद १००० धावा अॅडम गिलख्रिस्टने केल्या होत्या. तर सर्वात जलद २००० धावा, ३००० धावा आणि ५००० धावा सुरेश रैनाने केल्या होत्या.

### कोहलीने चांगली सुरूवात करून दिली

आयपीएल २०२४ मध्येही विराट कोहलीची बॅट चांगलीच तळपताना दिसली आहे. १७व्या हंगामात सर्वाधिक धावा करणारा फलंदाज हा विराट कोहलीचं आहे त्याच्या आसपासही इतर कोणताच फलंदाज नाही.विराट कोहली आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आहे. या यादीत शिखर धवन दुसऱ्या, रोहित शर्मा तिसऱ्या, डेव्हिड वॉर्नर चौथ्या आणि सुरेश रैना पाचव्या स्थानावर आहे. या यादीत महेंद्रसिंग धोनी (५२४३ धावा) सहाव्या, एबी डिव्हिलियर्स (५१६२ धावा) सातव्या, ख्रिस गेल (४९६५ धावा) आठव्या, रॉबिन उथप्पा (४९५२ धावा) नवव्या आणि दिनेश कार्तिक (४८३१ धावा) दहाव्या स्थानावर आहे.एलिमिनेटर सामन्यात विराट कोहलीने संघाला चांगली सुरूवात करून दिली.